# श्री गणपती स्तोत्र

|श्री गणपती स्तोत्र||

साष्टांग नमन हे माझे गौरीपुत्रा विनायका ।
भक्तीनें स्मरतो नित्य आयुःकामार्थ साधती ‖ १ ‖

प्रथम नांव वक्रतुंड दुसरें एकदंत ते ।
तिसरे कृष्णपिंगाक्ष चवथे गजवक्र ते ‖ २ ‖

पांचवे श्रीलंबोदर सहावें विकट नांव ते ।
सातवे विघ्नराजेंद्र आठवे धुम्रवर्ण ते ‖ ३ ‖

नववे श्री भालचंद्र दहावे श्री विनायक ।
अकरावे गणपती बारावे श्री गजानन ‖ ४ ‖

देवनांवे अशी बारा तीन संध्या म्हणे नर ।
विघ्नभीती नसे त्याला प्रभो ! तू सर्व सिद्धिदे ‖ ५ ‖

विद्यार्थ्याला मिळे विद्या धनार्थ्याला मिळे धन ।
पुत्रार्थ्याला मिळे पुत्र मोक्षार्थ्याला मिळे गति ‖ ६ ‖

जपता गणपती स्तोत्र सहा मासांत हे फळ ।
एक वर्ष पुर्ण होतां मिळे सिद्धी न संशय ‖ ७ ‖

नारदांनी रचिलेले झाले संपूर्ण स्तोत्र हें ।
श्रीधराने मराठींत पठण्या अनुवादिले ‖ ८ ‖

‖ श्रीगणपती स्तोत्र संपूर्ण ‖

****

Chalisamantras.com